# ऋणनिर्देश

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठातील लोकप्रशासन विषयाच्या पीएच. डी (Ph. D.) पदवीसाठी **"महाराष्ट्रातील ग्रामीण महिला नेतृत्वाचा उदय आणि ग्रामीण विकास प्रशासनातील त्यांची भूमिका : लातूर जिल्ह्याचा विशेष अभ्यास"** हा शोधप्रबंध सादर करीत असताना मला अत्यंत आनंद होत आहे. हा प्रबंध पूर्ण करण्याकरिता ज्यांनी मला मोलाचे मार्गदर्शन केले ते माझे मार्गदर्शक व आदरणीय गुरुवर्य डॉ. एम. सी. पवार सर यांची मी ऋणी आहे. त्यांनी वेळात वेळ काढून विद्यापीठातील कामामध्ये व्यस्त असतानादेखील मला वेळोवेळी मार्गदर्शन केल्यानेच मी हा शोधप्रबंध पूर्ण करू शकले.

शोधप्रबंधाचे काम करीत असताना ज्यांनी मला सतत सहकार्य व मार्गदर्शन केले त्या लोकप्रशासन विषयाच्या विभागप्रमुख डॉ. प्रतिभा पाटील यांची मी ऋणी राहीन. तसेच डॉ. नंदकुमार नाईक, डॉ. सतीश दांडगे, डॉ. शाम सिरसाठ, डॉ. प्रतिभा उन्हाळे, राज्यशास्त्र विभागातील डॉ. बी. एस. वाघमारे सर या सर्वांच्या सहकार्याबद्दल मी ऋण व्यक्त करते.

शोधप्रबंधाचे काम सुरू असताना माझे पती प्रा. बालाजी रुपनर यांनी कौटुंबिक जबाबदारीबरोबरच शोधप्रबंधाच्या कामात मला सतत मार्गदर्शन केले. माझे वडील श्री. सुभाष धायगुडे, आई सौ. रमा धायगुडे, बहीण कल्पना धायगुडे यांनीही या कामात सतत प्रोत्साहन देऊन शोधप्रबंध पूर्ण करण्यासाठी मला प्रेरणा दिली. या सर्वांचे मी ऋण व्यक्त करते.

माझे भाऊ सचिन व अमोल यांनीही मला हा प्रबंध पूर्ण करण्यासाठी मोलाचे सहकार्य केले. शोधप्रबंधाचे काम सुरू असताना माझी लहान मुलगी वृंदा हिच्यासाठी मी कधी कधी वेळ देऊ शकले नाही. मात्र तिनेही या काळात कोणता बालहट्ट केला नाही. यामुळे मी या कठीण कामाला अधिक वेळ देऊ शकले.

याशिवाय प्राचार्य डॉ. व्ही. एन. इंगोले, प्रा. सावित्री देवर्षी, प्रा. लक्ष्मण कोत्तापल्ले, प्रा. सुभाष भिंगे, प्रा. रामेश्वर खंदारे, प्रा. सतीश ठोंबरे यांचेही मला मोलाचे सहकार्य लाभले. त्यांचे मी इथे ऋण व्यक्त करते.

प्रबंधाच्या पूर्ततेसाठी सतत सहकार्य करणारी माझी मैत्रिण प्रा. आशा अकोलकर, प्रा. कल्पना घाडगे, तसेच ज्यांचे या कामी मला प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष सहकार्य लाभले. याशिवाय हे काम यशस्वीपणे पूर्ण करण्याच्या कामी माझ्या ज्या हितचिंतकांचे, आप्तेष्टांचे मला प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष सहकार्य लाभले, त्या सर्वांचे ऋण व्यक्त करणे मी माझे कर्तव्य समजते.